# जाहिरात

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०११

जाहिरात क्रमांकः—०१/११ **ठिकाणः— मुंबई पोलीस आयुक्तालय** दिनांक ०१/१०/२०११

महाराष्ट्र पोलीस शिपाई ( सेवाप्रवेश ) नियम २०११ आणि शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार **पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या घटकात** खाली नमूद पदांसाठी पोलीस भरती आयोजित करण्यांत येत आहे.

१. पोलीस शिपाई :—

| अजा | अज | विजा—अ | भज—ब | भज—क | भज—ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४२८ | ५८७ | १२९ | १०६ | ११६ | ६७ | ५४ | ५६२ | १४१८ | ३४६७ |

उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१२ अखेरपर्यत रिक्त होणाऱ्या पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली असल्याने अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना त्या त्या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

२ (१) वर नमूद पोलीस शिपाई पदांमधून चालक पोलीस शिपायांची पदे भरण्यात येतील. पोलीस शिपाई चालक या पदाकरिता वेगळी भरती घेण्यात येणार नाही.

(२) वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील. सदर पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यांत आलेली आहेत.

(३) खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल, महिला यांचेकरिता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ठ आहे.

शासनाने पोलीस भरतीचे आवेदन अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने जाहिरातीत नमुद अटींची पुर्तता करणारे उमेदवार यांचेकडून **खालील दिलेल्या विहीत दिनांकाच्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज मागविण्यांत येत आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन आवेदन अर्ज सुरू होण्याचा दिनांक व वेळ | ०७/१०/२०११ रोजी ०९.०० वा. पासून |
| २ | ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | ०१/११/२०११ रोजी २३.५९ वा. पर्यत |
| ३ | बँकेत पैसे भरण्याचा शेवटचा दिनांक | ०३/११/२०११ (बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत) |
| ४ | ट्रॅन्झॅक्शन आयडी भरण्याचा शेवटचा दिनांक | ०५/११/२०११ रोजी २३.५९ वा. पर्यत. |

ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आणि भरतीची जाहिरात **www.mahapoliceonline.org** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२......

ज्या उमेदवारांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध नसेल किंवा इंटरनेटचा वापर करण्याकरिता ज्यांना अडचणी येत असतील, त्यांच्याकरिता ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) उघडण्यांत आले आहे. उमेदवार सदर नमूद कोणत्याही एका केंद्रावर जावून तेथील संस्थेच्या प्रतिनिधींच्या सहाय्याने **नि:शुल्क** ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करू शकतात. या जिल्हयांत असलेले ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) चे केंद्र व आवश्यक माहिती **www.mahapoliceonline.org** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. तसेच या जिल्हयातील ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) ची माहिती जाहिरातीत दर्शविण्यांत आलेली आहे. **ज्या उमेदवारांना ऑनलाईन आवेदन अर्ज भरण्यास काही अडचणी असतील त्या उमेदवारांना पोलीस मुख्यालयात ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता आवश्यक ती मदत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून केली जाईल.**

**३. मुंबई शहर व उपनगर या रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन कार्यालयात, तसेच समाज कल्याण, जिल्हा सैनिक बोर्ड, आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रात नाव नोंदविलेले उमेदवार, या जाहिरातीत नमूद केलेल्या अटी व शर्तींची तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करीत असतील, तर त्यांनी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**

**४. परीक्षा शुल्क :** रू. १००/— ( रु. शंभर फक्त ) राहील. ऑनलाईन आवेदन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणाऱ्या विहीत चलनाव्दारे उमेदवारांने **भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये रू. १००/— कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.** बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करून देण्यात आलेला **Transaction ID पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या नोंद केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.** महाराष्ट्रातील भारतीय स्टेट बॅकेच्या शाखांची यादी www.mahapoliceonline.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**उमेदवाराने सदर** Transaction ID **ची नोंद त्यांच्या आवेदन अर्जात खालील प्रमाणे करावी.:—**

१) बँकेत १००/— रूपये जमा केल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या केल्यावर शासकिय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वत:चा युजर आयडी व पासवर्डव्दारे प्रवेश ( Log In ) करून Apply Exam Post या बटणावर क्लिक करावे व Update Transaction ID या बटणावर क्लिक करून बॅकेकडून प्राप्त झालेला Transaction ID अचूकपणे नोंदवावा. **बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यांत आली असेल तरच उमेदवाराचा आवेदन अर्ज पुढील परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल.** अन्यथा पुढील कार्यवाही होऊ शकणार नाही. उमेदवाराच्या भरतीकरिता उघडण्यांत आलेल्या प्रोफाईलवर, तसेच ईमेल आयडी तथा मोबाईल क्रमांक नमुद केला असेल तर पूर्ण भरलेल्या अर्जाबाबतचे पुष्टीकरण ( Confirmation ) देण्यांत येईल. ऑनलाईन आवेदन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणाऱ्या विहीत चलनाची प्रत ( Printout ) उमेदवारास निशुल्क उपलब्ध करून देण्यांत येईल. या नि:शुल्क सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे, बँक चलनाची प्रिंट आऊट मिळणे, तसेच पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडीची नोंद करणे राहील.

३.....

२) उमेदवारांनी संकेतस्थळावर नोंदविलेला Transaction ID वैध असल्यास **प्रवेशपत्र** उमेदवाराच्या भरतीकरिता उघडण्यांत आलेल्या प्रोफाईलवर, तसेच त्यांच्या नोंदणीकृत ई–मेल वर प्राप्त होईल. **उमेदवारास पुष्टीकरण, प्रवेश पत्र किंवा इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रतीची प्रत ( Printout ) ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर ( OAC ) कडून हव्या असतील तर प्रती प्रत रू. ३/– अशा दराने (Printout) उपलब्ध करून देण्यांत येईल.**

५. **वेतनश्रेणी : रु.** ५,२००–२०,२००( ग्रेड पे रु. २,०००)+ रु. ५०० विशेष वेतन व इतर देय भत्ते. पोलीस शिपाई पदावर नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या पोलीस शिपायांस ‘‘ पारिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना ’’ लागू ठरेल.

६. **वयोमर्यादा :** उमेदवाराचे वय दि. ३१/१०/२०११ रोजी कमीत कमी १८ वर्षे पूर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे. मागासवर्गीय उमेदवारांना ५ वर्षे शिथिलक्षम.

७. **शैक्षणिक अर्हता :** महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ ( सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यांत येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा **( इयत्ता १२ वी )** किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, ( राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकंडरी स्कूल परीक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परीक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यांत येण्याऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत ) (१२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष बाबतचे गृह विभाग शासन पत्र क्र. आरसीटी–०३०५/सीआर–२६६/पोल–५ अ, दि. २९/०६/२००५ चे नुसार )

८. **शारीरिक पात्रता :**

| | महिलांकरिता | पुरूषांकरिता |
|---|---|---|
| अ)उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १६५ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| ब)छाती | — | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा. |

९. **शारीरिक चाचणी** :– जे उमेदवार शारिरिक मोजमाप पात्रतेनुसार उंची व छातीमध्ये पात्र ठरतील, त्यांच्या सर्व प्रमाणपत्रांची सूक्ष्मरित्या छाननी करण्यात येईल व विहीत नियमावलीनुसार ते सर्व शैक्षणिक किंवा विशिष्ट उमेदवारांच्या जसे महिला उमेदवार, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, गृहरक्षक दल, माजी सैनिक इत्यादी समांतर आरक्षणासाठी आवश्यक अटी व शर्ती पूर्ण करीत असल्याची शंभर टक्के खात्री होऊन त्यात योग्य आढळून आलेल्या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी खालील प्रमाणे घेण्यात येईल (शारीरिक चाचणीत देण्यात येणाऱ्या गुणांचा सविस्तर तपशील www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

| पुरुष उमेदवार | | महिला उमेदवार | |
|---|---|---|---|
| (१) ५ कि. मी. धावणे | —२० गुण | (१) ३ कि.मी. धावणे | —२५ गुण |
| (२) १०० मि. धावणे | —२० गुण | (२) १०० मि. धावणे | —२५ गुण |
| (३) गोळा फेक | —२० गुण | (३) गोळा फेक (४ कि.ग्रॅ.) | —२५ गुण |
| (४) लांब उडी | —२० गुण | (४) लांब उडी | —२५ गुण |
| (५) १० पुल अप्स | —२० गुण | | |
| एकूण | १०० गुण | एकूण | १०० गुण |

**१०. लेखी चाचणी :—** शारीरिक चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवून पूर्ण करतील, त्यांच्यापैकी, गुणवत्ताक्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पद संख्येच्या १:१५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना पोलीस भरतीच्या नियमानुसार १०० गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:**

**(१) अंकगणित**      **(२) सामान्यज्ञान व चालू घडामोडी**
**(३) बुध्दिमत्ता चाचणी**      **(४) मराठी व्याकरण**

**लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाची राहतील.**

**११. शारीरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.एसआरव्ही—१०९७/प्र.क्र. ३१/९८/१६-अ, दिनांक १६/३/१९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल. उमेंदवारांना समान गुण मिळाल्यास त्यांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग निर्णय प्रानिमं—२००७/प्र.क्र.४६/०७/१३अ, दिनांक २७/६/२००८ मधील तरतुदीनुसार लावला जाईल.**

**१२. वैद्यकिय चाचणी :—**महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदीनुसार निवड झालेल्या उमेंदवारांची वैद्यकिय तपासणी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या तरतुदीनुसार करण्यात येईल. वैद्यकिय चाचणीत दृष्टीदोष, तिरळेपणा, रातआंधळेपणा, वर्णाधिळेपणा, गुडघ्यास गुडघा लागणे, सपाट तळवे, त्वचारोग, छातीचे रोग, तोतरेपणा व एड्स या चाचण्यांचा समावेश असेल. या चाचण्यांमध्ये उमेदवारांत दोष आढळल्यास अथवा उमेदवार अपात्र ठरल्यास त्यास नियुक्ती देण्यात येणार नाही.

१३. **पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च, प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसूल करण्यात येईल. अशा प्रकारचे बंधपत्र (बॉड/हमीपत्र) संबंधीत उमेदवारांकडून घेण्यात येईल.**

५.......

**१४. माजी सैनिक** :— शासनाने शासन निर्णय क्र. आरसीटी-०३०९/प्र.क्र. ६९२/पोल ५अ, दि. ०७/०४/२०११ व शासन निर्णय क्र. आरसीटी-०३०९ प्र.क्र. ६९२ पोल ५अ, दि. ०९/०९/२०११ अन्वये **माजी सैनिकांना शारीरिक पात्रतेत सवलती दिल्या आहेत. सदर सवलती नुसार माजी सैनिकांना शारीरिक चाचणीत देण्यात येणाऱ्या गुणांचा सविस्तर तपशिल www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

१५. सेवा प्रवेश नियम २०११ नुसार **अनुकंपा तत्वावरील भरतीमध्ये फक्त सेवेत असताना मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या एका पात्र वारसाचा समावेश असेल.** सदर नियमानुसार पात्र ठरलेल्या वारसाची शारीरिक व लेखी चाचणी घेण्यात येणार नाही. त्यांना संबंधित घटकप्रमुखाकडे असलेल्या यादीवरील जेष्ठता क्रमांनुसार व सामान्य प्रशासन विभाग यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती देण्यात येईल.

१६. **पोलीस दलातील बेपत्ता कर्मचारी किंवा असाध्य रोगामुळे किंवा अन्य कारणांमुळे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रानुसार ज्यांना वैद्यकिय कारणास्तव सेवा निवृत्त करण्यात आले आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या एकाच पात्र नातेवाईकास पोलीस भरतीमध्ये सेवाप्रवेश नियम-२०११ मधील नियम ३(२)(ड) नुसार पात्र ठरविण्यात येईल.**

**सदर नियमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस भरतीमध्ये आवेदन अर्ज भरणे आवश्यक राहील. तसेच सर्वसाधारण उमेदवाराप्रमाणेच त्यांची शारीरिक व लेखी चाचणी घेण्यात येईल. सदर उमेदवारास अनुकंपा तत्वावरील उमेदवाराप्रमाणे उंची व छातीमध्ये सवलत देण्यात येईल.**

**टिप :—** वैद्यकिय तपासणी तसेच नक्षलग्रस्त भागातील विशेष तरतुद खेळाडु, महिला, गृहरक्षक दल, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, व भुकंपग्रस्त इत्यादी पदांकरिता असलेले आरक्षण, पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांबाबतच्या सवलती व अनुकंपा तत्वावरील भरती या बाबतची सविस्तर माहिती www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१७. अर्ज करण्याची पध्दत:—**

१) उमेदवाराकडून ऑनलाईन अर्ज भरून घेण्याकरीता वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची निवड करण्यात आलेली आहे. उमेदवारांकडून आवेदन अर्ज भरून घेण्याकरिता www.mahapoliceonline.org हा U.R.L. निर्माण करण्यात आलेला आहे.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर संकेतस्थळावर पाहता येईल.

३) पात्र उमदेवार वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन आवेदन अर्ज www.mahapoliceonline.org या संकेतस्थळाद्वारे दि. ०७/१०/२०११ ते दि. ०१/११/२०११ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो (रूंदी ३.५ सें.मी. x ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रूंदी ३.५ सें.मी.x२.५ सें.मी.) आणि ३०० DPI Resolution आणि ५०k.b. पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य आहे.

५) बॅकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकिय कार्यालयीन कामकाजाच्या दोन

६......

दिवसांनंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बॅकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच भरतीसंदर्भातील पुढील प्रक्रिया होऊ शकेल.

६) विहित पध्दतीने अर्ज सादर करून शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दि. ०१/११/२०११ रोजी २३:५९ वाजेपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बॅकेमध्ये दि. ०३/११/२०११ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

७) विहित पध्दतीने सर्व टप्प्यातील अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही या कार्यालयाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

८) कार्यालयाने विहित केलेल्या पध्दतीनूसार Transaction ID ची नोंद अचूक रित्या, विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्विकारला जाणार नाही.

## १८. उमेदवारासाठी आवश्यक सुचना

१) **प्रस्तुत भरतीकरिता सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येतील. अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज भरतीकरिता स्विकारले जाणार नाहीत.**

२) **उमेदवाराने उपलब्ध असलेल्या घटकापैकी एकाच घटकात आवेदन अर्ज करणे बंधनकारक राहील. एकापेक्षा जास्त भरती घटकात आवेदन अर्ज केल्यास सदर उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येवून त्याला भरतीकरिता अपात्र घोषित करण्यात येईल आणि त्यांचे विरूध्द उचित दंडात्मक कारवाई केली जाईल. उमेदवारास दुसऱ्या भरती ठिकाणी आवेदन अर्ज करावयाचा झाल्यास त्याने पहिल्या ठिकाणी भरलेला आवेदन अर्ज रद्द करणे आवश्यक राहील.**

३) पोलीस भरतीमध्ये सहभागी होणारा कोणताही उमेदवार कोणत्याही एका घटकाकरिता कोणत्याही ठिकाणाहून ऑनलाईन आवेदन अर्ज भरू शकतो. त्याकरिता प्रत्येक उमेदवारानी केंद्रावरच आवेदन अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. ज्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता अडचणी असतील त्या उमेदवारांना आवेदन अर्ज भरण्यासाठी मदत करण्याकरिता ऑनलाईन केंद्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

४) **उमेदवारास पोलीस शिपाई पदावर ज्या घटकात नियुक्ती देण्यात आलेली आहे त्या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात त्याची बदली करता येणार नाही.**

५) **उमेदवाराने अर्जाची नोंदणी केल्यानंतर तो त्याच्या स्वतःच्या नावात, वडीलांच्या नावात, आईच्या नावात, जन्मदिनांक, त्याचे स्वतःचे छायाचित्र व त्याची सही आदि. मध्ये बदल करू शकत नाही. परंतु माहिती भरल्यानंतर Submit बटन दाबण्याच्या पुर्वी उमेदवार त्याचा पत्ता व इतर माहिती, शैक्षणिक माहिती आदि. मध्ये बदल करू शकतो. परंतु Submit बटन दाबल्यानंतर जर उमेदवारास माहितीमध्ये बदल करावयाचा असल्यास उमेदवार त्याच्या profile वर जाऊन Cancel Application बटन वर क्लिक करून ॲप्लीकेशन Cancel करू शकतो. ज्या उमेदवाराकडून आवेदन अर्जाचे शुल्क आकारले आहे त्याच उमेदवारास Cancel Application बटन प्राप्त होईल. प्रथम भरलेले ॲप्लीकेशन Cancel केल्यानंतर ॲप्लीकेशन शुल्क परत मिळणार नाही. प्रथम केलेले ॲप्लीकेशन Cancel केल्यानंतर दुसऱ्यांदा ॲप्लीकेशन भरण्याकरिता पुन्हा रू. १००/— प्रवेश शुल्क आकारले जाईल.**

६) " आवेदन अर्ज " भरण्याची ठिकाणे www.mahapoliceonline.org या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. त्यानुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरता येतील.

७......

७) आवेदन अर्ज एकदा Submit केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. काही कारणास्तव दुरूस्ती करावयाची झाल्यास उमेदवार profile वर जाऊन आवेदन अर्ज रद्द करून आवश्यक दुरूस्ती करू शकतात, ही सुविधा ज्यानी शुल्क भरले आहे त्यांच्या करिताच उपलब्ध राहिल.

८) उमेदवार ज्या प्रवर्गात मोडतो त्या प्रवर्गाची (सामाजिक/समांतर) माहिती, वैयक्तिक आणि शिक्षणाची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. **उमेदवारास कोणत्याही एका समांतर आरक्षणाचा लाभ देय राहील.**

९) **उमेदवाराविरूध्द गुन्हा दाखल असेल तर गुन्हयाच्या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे.**

१०) **पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारांचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय नियुक्ती देण्यात येणार नाही.**

११) अर्जासोबत रू. १००/— इतकी रक्कम फी म्हणून भारतीय स्टेट बॅकेच्या कोणत्याही शाखेत भरू शकतात. ज्या उमेदवारांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध नसेल किंवा इंटरनेटचा वापर करणेकरिता ज्यांना अडचणी येत असतील, असे उमेदवार ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) यांचेकडे जाऊन नि:शुल्क आवेदन अर्ज करू शकतात. या नि:शुल्क सुविधांमध्ये आवेदन अर्ज भरणे, बॅक चलनाची प्रिंट आऊट मिळणे, तसेच पैसे भरल्यानंतर ट्रॅन्झॅक्शन आयडीची नोंद करणे राहील. परंतु उमेदवारास पुष्टीकरण, प्रवेश पत्र किंवा इतर कोणत्याही कागदपत्रांच्या प्रतीची प्रत (Printout) ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) कडून हव्या असतील तर प्रती प्रत रू.३/— अशा दराने (Printout) उपलब्ध करून देण्यात येईल.

१२) उमेदवाराने भरतीकरिता येताना सोबत प्रवेशपत्र आणावे. विहित नमुन्यातील प्रवेश पत्राशिवाय भरतीच्या कोणत्याही टप्प्यावरील चाचणीस/ तपासणीस प्रवेश दिला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

१३) आवेदन अर्ज भरण्याकरिता सर्व घटकात उपलब्ध असलेल्या संस्थेचे केंद्र www.mahapoliceonline.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यापैकी या घटकात आवेदन अर्ज भरण्याकरिता उपलब्ध असलेली ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) खालील नमूद ठिकाणी उपलब्ध होतील.

**मुंबई पोलीस घटकासाठी अधिकृत ऑन लाईन ॲप्लीकेशन सेटर्स**

| क्र | ओएसीचे नांव | पत्ता . | संपर्कासाठी दूरध्वनी व मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | स्टडी सर्कल | १०२, पहिला मजला, डेक्कन विहार, बी.एस.रोड, दादर (प), मुंबई — ४०० ०२८ | कल्पेश महाजन ०२२—२४३८४२४६ ९९७५२८८९३४ |
| २ | महाराष्ट्र करीअर अकॅडमी | स्नेहलता राणे गर्ल्स हायस्कूल, डिसील्व्हा हाउस्कूल समोर, एस. के. बोले रोड, कबूतरखान्या जवळ, दादर (प) ४०० ०२८ | अमीन राजापकर ०२२—६४२०४१४८ ९७६९६३४२७५ |

८........

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नेटवर्ल्ड कॉम्प्युटर्स, | शॉप नं. १३, डी विंग, सॅटेलाईट पार्क, बिल्डींग, विचारे कुरियरच्या बाजूस, सुभाष रोड, जोगश्वरी (पू) मुंबई – ४०० ०६० | संतोष ०२२–२८२०६१९४ ९९६७५५४०२१ |
| ४ | ट्रिनीटी अकॅडमी फॉर कार्पोरेट ट्रेनिंग लिमिटेड | ट्रिनीटी हाउस, प्लॉट नं. ५बी, कुरेशी नगर, गिरनार टी काम्प्लेक्सच्या बाजूला, लॅन्डमार्क बुन्तरा भुवन, कुर्ला (पू) मुंबई ४०० ०७० | रोहित सप्रा ०२२–२४०५६७१२ ९२२४४७३९११ |
| ५ | श्री कॉम्पुटर इन्स्टीटयुट | खारदेव नगर बसस्टॉप समोर, सिध्दी विनायक स्टोअर्स जवळ, एन. जी. आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ | निलिमा शिंदे ०२२–२५२१४६०९ ९३२१५९७७२३ |
| ६ | घाटले गावदेवी उत्कर्ष मंडळ | घाटले गावदेवी मैदान, घाटले गाव, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ | चित्रानंद पेडणेकर ९८३३०२०००४ |
| ७ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांचे कार्यालय, मुंबई. | आल्ड बझार गेट पो.स्टेशन बिल्डींग, जी.पी.ओ. समोर, वालचंद हिराचंद मार्ग, मुंबई ४०० ००१ | ०२२–२४६९१३७० |
| ८ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ यांचे कार्यालय, मुंबई. | वाहतुक प्रशिक्षण इमारत, सर जे.जे. मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८ | ०२२–२४६९१४१० |
| ९ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय, मुंबई. | बावला कंपाऊंड, डॉ. बी.ए. रोड, भायखळा, मुंबई ४०० ०२७ | ०२२–२४६९१३८९ |
| १० | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ यांचे कार्यालय, मुंबई. | माटुंगा पोलीस ठाणे इमारत, १ ला मजला, डॉ. बी.ए. रोड, ( किंग्ज सर्कल ) मुंबई | ०२२–२४६९१४३९ |
| ११ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांचे कार्यालय, मुंबई. | वरळी पोलीस ठाणे इमारत, ५ वा मजला, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०० ०२५ | ०२२–२४६९१४२१ |
| १२ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६ यांचे कार्यालय, मुंबई. | प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर्ट गॅलरी कॉम्लेक्स, आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ | ०२२–२४६९१४७८ |
| १३ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७ यांचे कार्यालय, मुंबई. | मुलुंड पोलीस ठाणे इमारत,१ ला मजला,नेताजी सुभाष रोड, मुलुंड ( प.), मुंबई ४०० ०८० | ०२२–२४६९१५२१ |
| १४ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ८ यांचे कार्यालय, मुंबई. | बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स पोलीस ठाणे इमारत,१ला मजला, बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स रोड, आय.सी.आय.सी.आय बॅंके समोर, बांद्रा (पू), मुंबई ५१ | ०२२–२४६९१५४५ |
| १५ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९ यांचे कार्यालय, मुंबई | बांद्रा पोलीस ठाणे जवळ, हिल रोड, बांद्रा (प), मुंबई ४०० ०५० | ०२२–२४६९१५४३ |
| १६ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १० यांचे कार्यालय, मुंबई | एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे इमारत, २ रा मजला, कॉन्ट्रक्ट मेन रोड, एम.आय.डी.सी., अंधेरी ( पू ), मुंबई ४०० ०९३ | ०२२–२४६९१५८३ |
| १७ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११ यांचे कार्यालय, मुंबई | बोरीवली पोलीस ठाणे इमारत, २ रा माळा,एस.व्ही. रोड, बोरीवली ( प ), मुंबई ४०० ०९७ | ०२२–२४६९१६०३ |

९........

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२ यांचे कार्यालय, मुंबई | शैलेंद्र नगर, जूने दहिसर पोलीस ठाणे एस.व्ही. रोड, दहिसर ( पू ), मुंबई ४०० ०६८ | ०२२—२४६९१६१७ |
| १९ | पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ यांचे कार्यालय, मुंबई | बी.पी.टी. रेल्वे इमारत,१ ला मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८ | ०२२—२४६९१३७४ |

**टिप :— अ.क्र. ७ ते १९ समोरील कार्यालये सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंतच कार्यरत राहतील. तसेच सार्वजनिक सुट्या, दुसरा व चौथा शनिवार आणि रविवार या दिवशी सदर कार्यालये बंद राहतील.**

१४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत तसेच बॅकेत प्रवेश शुल्क भरण्याबाबतच्या पध्दतीच्या सविस्तर सूचना जाहिरातीत नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्या नुसार अर्ज व शुल्क भरण्याची उमेदवाराने दक्षता घ्यावी.

१) शारीरिक पात्रतेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राची छाननी करण्यात येईल. प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी उमेदवाराने (लागू असलेल्या) प्रमाणपत्राची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिकाऱ्याने सांक्षांकित केलेल्या छायांकित प्रती कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच **त्यासोबत मूळ (Original) प्रमाणपत्रे दाखवणे बंधनकारक आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या सादर केल्यास त्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. मूळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची म्हणजेच दि. ३१/१०/२०११ किंवा त्यापूर्वीच्या तारखेची असणे आवश्यक आहेत. या तारखेनंतरची प्रमाणपत्रे कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरली/ स्विकारली जाणार नाहीत.**

२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आरसीटी-०३१०/प्र.क्र. २१२/पोल ५ अ, दि. १६/०४/२०१० नुसार क्रिमिलेअरचे तत्व लागू करण्यात आलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडे जाती प्रमाणपत्र व उन्नत व प्रगतवर्गात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (N.C.L.) अशी दोन प्रमाणपत्रे कागदपत्र पडताळणीच्या वेळी असतील तरच आरक्षणाविषयक लाभ देय ठरतील. ही दोन्ही प्रमाणपत्रे नसतील तर आरक्षणविषयक लाभ देय ठरणार नसून अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उमेदवार समजण्यात येईल व खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या वयोगटाच्या अटी त्यांना लागू राहतील. त्यासाठी त्यांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी तसे लेखी संमतीपत्र द्यावे लागेल. त्यानंतर कोणतेही निवेदन किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

१५) वर नमूद केल्यानुसार साक्षांकित केलेल्या खालील प्रमाणपत्रांच्या प्रती उमेदवारांनी सादर करणे आवश्यक राहील.

a. शाळा सोडल्याचा दाखला
b. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.
c. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी २००९/प्र.क्र. २९१/

१०.....

०९/१६ ब, दि. ०५/११/२००९ नुसार मागासवर्ग उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

d. प्रकल्पग्रस्त असल्यास, त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रमाणपत्र.

e. अधिवास ( डोमेसाईल ) प्रमाणपत्र.

f. महिला व बालकल्याण विभाग, तसेच सामाजिक न्यायविभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे ( नॉन क्रिमीलेअर ) निकटतम वर्षाचे प्रमाणपत्र. (दि. ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या वित्तीय वर्षासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दि. ३१/१०/२०११ किंवा त्यापुर्वी दिलेल्या तारखेपुर्वीची प्रमाणपत्रे ग्राह्य धरली जातील.)

g. विविध आरक्षण प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी संबंधीत प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

h. खेळाडू आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारानी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२,दि. ३० एप्रिल २००५ नुसार आवश्यक असलेले क्रीडा विषयक प्रमाणपत्र.

**टिप**:— १) खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार तसेच खुल्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार (पुरूष व महिला) यांना संबंधित आरक्षणाच्या लाभासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

२) खेळाडू प्रवर्गाचा लाभ मिळण्यासाठी उमेदवाराने सादर केलेली क्रीडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अंतिम तपासणीसाठी पाठविण्यात येतील व तपासणी अंती सदर प्रमाणपत्र वैध ठरल्यास त्यांना नियुक्ती देण्यात येईल.

३) खेळाडूंच्या प्रमाणपत्रांचा दर्जा केवळ क्रीडा संचालनालयाकडून (त्यांच्या प्रतिनिधीकडून नव्हे) तपासून घेणे आवश्यक असल्याने अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून तपासून घेतलेले खेळाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

१६. सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार पुढील चाचणीसाठी पात्र राहतील.

१७. भरती प्रक्रियेमधील कोणत्याही चाचणीसाठी येण्याकरिता उमेदवारास प्रवास खर्च दिला जाणार नाही.
उमेदवारास प्रत्येक चाचणीकरिता स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१८. पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

१९ पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरीक इजा/ नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

२० भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

२१ पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टी करप्शन ब्युरो, मुंबई यांना ०२२—२४९२१२१२ व (टोल फ्री) १८००२२२०२१ या दूरध्वनी क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस

भरती समिती २०११ तथा अपर पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांच्याशी संपर्क साधून तक्रार करू शकतील.

२२. उमेदवारास पोलीस भरतीच्या संपूर्ण प्रक्रियेची रुपरेखा (Scheduled) उमेदवाराच्या भरतीकरिता उघडण्यात आलेल्या प्रोफाईलवर, ऑनलाईन ॲप्लीकेशन सेंटर (OAC) वर तसेच घटकातील मुख्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध होईल.

२३. सदर पोलीस भरतीची जाहिरात या घटकाच्या www. mumbaipolice.org तसेच www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**महत्वाची टिप :— उमेदवारांने पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ चे कृपया अवलोकन करावे. सदर सेवाप्रवेश नियमांतील अटी व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहतील. सदरचे सेवाप्रवेश नियम** www.mahapoliconline.org **या संकेत स्थळावर** ( Home page ) **उपलब्ध आहे**

**सही/—**
**( राजवर्धन )**
अध्यक्ष, पोलीस भरती समिती २०११,
तथा अपर पोलीस आयुक्त,
( आर्थिक गुन्हे ) मुंबई